वर्ष- १० | अंक- ४५ | मुंबई, मंगळवार, २४ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२४ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

पोलीस बातमी पत्र

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 दुधात चिमूटभर मीठ टाकून प्यायल्यास चेहऱ्याला खाज सुटते का?

3 → शिक्षणावर जनरेटिव्ह एआयचा प्रभाव

मोबाईल वापरण्यास दिला नाही म्हणून तरुणीची आत्महत्या ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## तिरुपती प्रसाद लाडू वादानंतर मंदिराच्या शुद्धीकरणासाठी महाशांती होम, प्रकरणाची चौकशी विशेष तपास समितीकडे





**■आंध्र प्रदेश। प्रतिनिधी:**

जगन मोहन रेड्डी मुख्यमंत्री असताना तिरुमला तिरुपती प्रसाद लाडूमध्ये भेसळ करुन प्राण्यांची चरबी वापरण्यात आली. असा खळबळजनक आरोप आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केला. त्यानंतर हा वाद पेटला आहे. तसंच त्या वेळच्या लाडूचे नमुने हे जेव्हा प्रयोगशाळेत धाडण्यात आले तेव्हा त्यात चरबी असल्याची बाबही समोर आली. आता हे प्रकरण समोर आल्यानंतर तिरुमला मंदिराच्या शुद्धीसाठी शांती होम सुरु करण्यात आला आहे. पंचगव्य प्रोक्षण होम करुन मंदिराची शुद्धी सुरु करण्यात आली आहे. तसंच हे प्रकरण एसआयटी म्हणजेच विशेष तपास समितीकडे सोपवण्यात आलं आहे.

लाडू भेसळ चौकशीसाठी विशेष तपास समिती प्रसाद लाडू भेसळ प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष तपास समिती स्थापण्यात आली आहे. पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेत ही समिती काम करणार आहे. एसआयटीकडून या प्रकरणाची चौकशी करण्यात येणार आहे यामध्ये सत्तेचा दुरुपयोग कुणी केला? हे देखील तपासलं जाणार आहे. या समितीचा अहवाल सरकारला सोपवला जाईल. हा अहवाल आल्यानंतर आम्ही कठोर पावलं उचलू असं चंद्रबाबू यांनी म्हटलं आहे. तिरुमला तिरुपती हे पवित्र देवस्थान आहे. या देवाच्या प्रसाद लाडूत पुन्हा भेसळ करण्याची हिंमत कुणी दाखवता कामा नये अशा प्रकारे आम्ही शासन करु असंही नायडू यांनी म्हटलं आहे. सध्या मंदिराच्या शुद्धीसाठी बंगारु बावी (सुवर्ण विहीर) आणि यज्ञशाळेत शांती होम केला जातो आहे.

### चंद्राबाबू नायडूंचा आरोप काय?

तिरुपती बालाजीचा प्रसाद म्हणून मिळणारे लाडू सध्या चर्चेत आहेत. याचं कारण आहे चंद्राबाबू नायडूंनी वाय एस आर जगन रेड्डींवर केलेला आरोप. माजी मुख्यमंत्री जगन रेड्डी यांच्या कार्यकाळात या लाडूंमध्ये जनावरांची चरबी वापरली गेली आणि लाडूंचं पावित्र्य भंग करण्यात आलं असा आरोप चंद्राबाबू नायडूंनी केला आहे. तिरुपती मंदिरात भाविकांना प्रसाद म्हणून दिल्या जाणाऱ्या लाडूंमध्ये प्राण्यांची चरबी आणि फिश ऑईलचे अंश आढळून आल्याचे सिद्ध झाले असल्याची माहिती लॅबच्या तपासणी रिपोर्टमधून समोर आली आहे.

### तिरुपती बालाजी मंदिरात लाडूंची परंपरा ३०० वर्षांपासून

तिरुपती बालाजी मंदिरात प्रसाद म्हणून तयार केल्या जाणाऱ्या लाडूची परंपरा ३०० वर्षांपासून आहे. इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार १७१५ या वर्षापासून तिरुपती मंदिरात लाडूचा प्रसाद तयार करण्यात येतो. या लाडूची खासियत आहे की हे लाडू बरेच दिवस खराब होत नाहीत. तसंच या लाडवांची किंमत १० रुपयांपासून ५० रुपयांपर्यंत अशी मर्यादित ठेवण्यात आली आहे. त्यामुळे तिरुपती बालाजीच्या दर्शनाला येणारा प्रत्येक भाविक लाडूचा प्रसाद घेऊन जातोच जातो. आता या लाडूंमध्ये भेसळ झाल्याची बाब समोर आल्याने या मंदिरात शांतीहोम केला जातो आहे.

## मेळघाटात खासगी बस पुलावरून कोसळली; ४० प्रवासी जखमी



**■अमरावती। प्रतिनिधी:**

अमरावतीहून धारणी येथे जात असलेली खासगी प्रवासी बस सेमाडोह नजीक पुलावरून कोसळून झालेल्या भीषण अपघातात ४० प्रवासी जखमी झाले असून तिघांची प्रकृती चिंताजनक आहे.

चावला ट्रॅव्हल्स कंपनीची बस सकाळी सहा वाजता अमरावती येथून धारणीला निघाली होती. सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास सेमाडोह नजीक भूतखोरा परिसरात धोक्याच्या वळणावर असणाऱ्या नदीच्या पुलावर बस चालकाचे नियंत्रण सुटले आणि ही बस पुलाखाली नदीत कोसळली. बसमधील ४० प्रवासी जखमी झाले असून त्यापैकी तिघांची प्रकृती गंभीर आहे. जखमींना सेमाडोह येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहेत.

अपघातानंतर तत्काळ मदत कार्य सुरू करण्यात आले. अपघात घडताच सेमाडोह येथील रहिवासी घटनास्थळी धावून गेले. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे कर्मचारी देखील घटनास्थळी पोहोचले. नदीत कोसळलेल्या अपघातग्रस्त बसमधील प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. या अपघाताची माहिती परतवाडा, चिखलदरा आणि धारणी पोलिसांना देण्यात आली. बचाव पथक अपघात स्थळी पोहचले आहे. अपघाताचे कारण शोधण्यासाठी तपास सुरू केला आहे. अपघातस्थळी स्थानिक पोलिस अधिकारी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून मदतकार्य पूर्ण केले.

या मार्गावर अनेकदा अशा घटना घडतात. वळण रस्त्यावरील अपघातांचा धोका लक्षात घेता प्रशासनाने या मार्गावर अधिक सुरक्षा उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. प्रवाशांसाठी योग्य सूचना फलक आणि रस्त्याचे व्यवस्थित देखभाल आवश्यक आहे, असे स्थानिक नागरिकांनी सांगितले. यापुवीर्ही या मार्गावर अनेक अपघात घडले आहे. परतवाडा ते धारणी हा मार्ग घाट वळणाचा आहे. रस्ता अरूंद आहे. पुलावर चालकांना काळजी घ्यावी लागते. थोडेही दुर्लक्ष हे प्राणघातक ठरू शकते.

गेल्या २४ मार्च रोजी सेमाडोह नजीक एसटी महामंडळाची बस खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात दोन महिलांचा मृत्यू झाला होता, तर २५ जण जखमी झाले होते. बसचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला होता. अमरावती वरून निघालेली परतवाडा आगाराची एम एच ०७ / ९४७८ क्रमांकाची बस परतवाडा घटांग, सेमाडोह मार्गे तूकईथड येथे जात असताना हा अपघात झाला होता. सेमाडोह नजीक जवाहर कुंड येथे ही बस सुमारे ३० फूट खोल दरीत कोसळली होती.

## विधानसभेसाठी पीएम मोदींनी फुंकलं रणशिंग महिनाभरात मोदी तिसऱ्यांदा महाराष्ट्रात

**पीएम मोदींचा महाराष्ट्र दौरा**

- १३ जुलैला मुंबईतील पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणाऱ्या महत्वाकांक्षी गोरेगाव-मुलुंड जोड रस्ता प्रकल्पाचं तसंच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून जाणाऱ्या जुळ्या बोगद्याच्या कामाचं भूमिपूजन मोदींनी केलं होतं.
- २५ ऑगस्टला मोदी जळगावच्या दौऱ्यावर होते.. लखपती दीदी कार्यक्रमात त्यांच्या हस्ते महिलांना प्रमाणपत्राचं वाटप करण्यात आलं होतं.
- ३० ऑगस्टला मोदी पालघर दौऱ्यावर होते... ७६,००० कोटी रुपये खर्चाच्या वाढवण बंदर प्रकल्पाचं भूमिपूजन मोदींनी केलं होतं.. याच दौऱ्यात शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यावरुन मोदींनी माफीसुद्धा मागितली होती..
- येत्या ५ ऑक्टोबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पोहरादेवीमध्ये विकास कामांचं लोकार्पण करणार आहेत.



**पीएम मित्रा योजना**

पीएम मित्रा योजनेअंतर्गत मोदी सरकारने अमरावतीमध्ये घोषित केलेल्या मेगा इंटीग्रेटेड टेक्सटाईल पार्कची पायाभरणी पीएम मोदींनी केली. अमरावतीच्या प्रकल्पात १० हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. तर तब्बल ३ लाख लोकांना रोजगार मिळणार असल्याने मोठ्या प्रमाणावर विदभार्तील युवकांना रोजगार मिळणार आहे. त्यामुळेच मोदींनी खास करुन विदभार्तून विधानसभा निवडणुकीचं रणशिंग फुंकल्याचं दिसून येतंय. गेल्या काही दिवसांपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सातत्याने महाराष्ट्रात दौरे करत आहेत.

**■मुंबई। प्रतिनिधी:**

पंतप्रधान नरेंद्र मोदी महिनाभरामध्ये तिसऱ्यांदा महाराष्ट्रात आले. वर्ध्यात मोदींच्या हस्ते विविध योजना आणि प्रकल्पांचं उद्घाटन करण्यात आलं. मोदींनी वर्धा दौऱ्यात कर्नाटकातल्या गणपती मूर्ती प्रकरणावरुन विरोधकांवर खास करुन काँग्रेसवर तोफ डागली. शाही परिवार म्हणत मोदींनी राहुल गांधी आणि त्यांच्या कुटुंबावर टीका तर केलीच. मात्र काँग्रेस पक्ष देशातील सर्वात मोठा भ्रष्ट पक्ष असल्याचा आरोपही मोदींनी केलाय. विधानसभा निवडणुकांआधी मोदींनी महाराष्ट्रात खास लक्ष घातल्याचं दिसतंय. खासकरुन विदर्भात. कारण लोकसभा निवडणुकीत महायुतीला विदर्भात मोठा फटका बसला होता. तर मविआने विदर्भात घवघवीत यश मिळवलं होतं.

### लोकसभेला विदर्भात महायुतीला नुकसान

लोकसभेच्या १० जागांपैकी विदर्भात फक्त दोनच जागांवर भाजपला विजय मिळवता आला होता. यापैकी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचा एक खासदार निवडून आला. २०१९ च्या तुलनेत भाजपला तीन आणि शिवसेनेचं दोन जागांवर नुकसान झालं. तर दुसरीकडे काँग्रेसने विदर्भात पाच जागा जिंकल्या. २०१९ च्या तुलनेत काँग्रेसने ४ जागा जास्त जिंकल्या. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने एक आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीने एक जागा जिंकली. संविधान बदलणार या नॅरेटिव्हनंतर भाजपपासून मागासवर्ग मतदार दूर गेला होता. मात्र या मतदारांना परत जोडण्याची सुरुवात भाजपने केलेली दिसतेय.. वर्धा दौऱ्यात पीएम विश्वकर्मा योजनेच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचं वाटप करण्यात आलं. ओबीसी, दलित आणि आदिवासी वर्गाला जोडण्याचा प्रयत्न भाजपकडून करण्यात येतोय. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोदींचे महाराष्ट्रातले हे दौरे महत्त्वाचे मानले जात आहेत.

## पुण्यातील टँकर ३ तासानंतर खड्डयातून बाहेर काढण्यात यश; जमीन खचली, खड्डा पडला, आणि...

पुण्यात रस्ता खचून खड्ड्यात पडलेला टँकर तीन तासांनंतर बाहेर काढला आहे. दोन क्रेनच्या सहाय्याने टँकर बाहेर काढण्यात यश आले आहे. पुणे शहरातील मुख्य पोस्ट



ऑफिस असलेल्या सिटी पोस्टाच्या आवारातील जमीन अचानकपणे खचली. त्यामुळे निर्माण झालेल्या खड्ड्यात महापालिकेचा एक टँकर पडला होता. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली. या दुर्घटनेत कुठलीही जिवीतहानी झाली नाही, मात्र, या धक्कादायक घटनेनं परिसरात खळबळ उडाली. सिटी पोस्टाच्या आवारात जुनी विहीर असण्याची शक्यता आहे.. अशी माहिती इतिहास संशोधक मंदार लवाटे यांनी दिली.

**■पुणे। प्रतिनिधी:**

पुण्यात एक धावता ट्रक खड्डयात पडल्याची घटना समोर आली आहे. पुण्याच्या समाधान चौकातील रोडच्या मध्यभागी असलेल्या भल्या मोठ्या खड्डयात हा ट्रक पडून दुर्घटना घडली आहे. या दुर्घटनेत कुठलीही जिवीतहानी झाली नसल्याची माहिती असून घटनास्थळी अग्निशमन दल दाखल झाले. अखेर तीन ते साडे तीन तासानंतर हा टँकर बाहेर काढण्यात यश आले आहे.

### मुंबईतील प्रभादेवी भागातील रस्ता पुन्हा खचला

मुंबईतील प्रभादेवी भागातील रस्ता पुन्हा खचलाय.. गणेसोत्सव काळात याच रस्त्यावर भलंमोठं भगदाड पडलं होतं... महानगर पालिकेकडून या रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली होती. मात्र हाच रस्ता पुन्हा त्याच ठिकाणी खचलाय.. त्यामुळे पाण्याच्या पाईपलाईनला गळती लागलीये.. यामुळे प्रभादेवी परिसर जलमय झालाय.. दरम्यान वारंवार रस्ता खचत असल्यामुळे ठाकरेंच्या शिवसेनेकडून आंदोलन करण्यात आलंय.. खड्डयांमध्ये वृक्षारोपण करत या प्रकरणी निषेध नोंदवण्यात आलाय..

### मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर तिहेरी अपघात

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर तिहेरी अपघात झालाय. ट्रक, टँकर आणि कारची एकमेकांना धडक दिली. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झालाय तर दोगं गंभीर जखमी झालेत.. पनवेलजवळील भाताण बोगद्याजवळ ही दुर्घटना घडलीये.. या अपघात एवढा भीषण होता की यात कारचा चक्काचूर झालाय.

### पुणे सातारा महामार्गावरील टोलनाक्यावर मारहाण

पुणे सातारा महामार्गावरील खेड शिवापूर टोलनाक्यावरील कर्मचाऱ्यांनी गुहागरहून स्वारगेटच्या दिशेने जाणाऱ्या एसटीच्या चालक आणि वाहकाला बेदम मारहाण केल्याची घटना घडली असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

जवळपास १५ जणांच्या टोळक्याने एसटीच्या दोन कर्मचाऱ्यांना बेदम मारहाण केली आहे. ट्रकने एसटी बसला डीवायडरच्या बाजूला दाबल्यानं याचा जाब विचारायला गेलेल्या चालकास या टोल नाक्यावरील व्यक्तीने सर्वप्रथम मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच बसेच्या वाहकाला देखील या टोळक्याने मारहाण करुन शिव्या देत धमकी दिल्याचे या बसचे वाहक प्रवीण भगवान नांगरे यांनी सांगितले. टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांच्या गुंडागर्दीच्या घटनेनंतर एसटीचे चालक आणि प्रवासी भयभीत, व्हिडीओ व्हायरल..झालाय ...यानंतर रात्री उशिरा चालकाने खेडशिवापूरच्या राजगड पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याची माहिती.

## १८०००००००००० रुपयांचा प्रकल्प गुजरातला गेला का? फडणवीस म्हणाले, 'बातमी आली म्हणून...'

**■मुंबई। प्रतिनिधी:**

राज्याचे विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी १८ हजार कोटींची गुंतवणूक गुजरातला गेल्याच्या आरोपावर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं आहे. नागपूरमध्ये गुरुवारी रात्री प्रसारमाध्यमांशी बोलताना फडणवीस यांना वडेट्टीवार यांनी केलेल्या आरोपांवरुन प्रश्न विचारण्यात आला असता त्यांनी वडेट्टीवारांवरच निशाणा साधला.

### वडेट्टीवार यांनी काय दावा केला?

''महायुती सरकारच्या नको त्या उद्योगांमुळे राज्यातील आणखी एक उद्योग गुजरातकडे,'' अशा मथळ्याखाली वडेट्टीवार यांनी आपल्या एक्स अकाऊंटवरुन गुरुवारी पोस्ट केली होती. ''महाराष्ट्रात येणारा आणखी एक प्रकल्प गुजरातला गेला आहे. नागपूरमध्ये सोलर पॅनल प्रकल्प येणार होता. या प्रकल्पाअंतर्गत १८ हजार कोटींची गुंतवणूक होणार होती. राजकीय आणि प्रशासकीय उदासीनतेमुळे हे प्रकल्प राज्याबाहेर गेल्याची माहिती पुढे आली आहे,'' असा दावा वडेट्टीवार यांनी केला होता. ''वेदांत-फॉक्सकॉन प्रकल्प, टाटा-एअरबस विमान प्रकल्प आणि आता सोलर पॅनल प्रकल्प गुजरातमध्ये गेला आहे,'' असा दावा वडेट्टीवार यांनी केला. तसेच पुढे बोलताना, ''हिंदू - मुस्लिम, जीभ कापा- जीभेला चटके द्या, पक्ष फोडा- आमदार पळवा... सतत असे निरर्थक उद्योग करणारे महायुती सरकार महाराष्ट्रात असल्यामुळे जगभरातील कॉर्पोरेट कंपन्या आणि उद्योगांना राज्यात उद्योग करणे कठीण झाले आहे. अधिकारी मंत्र्यांना खुश करण्यात व्यस्त आहे. मंत्र्यांची मस्ती, आमदारांचे नको ते लाड यामुळे महाराष्ट्राची पिछेहाट होत आहे आणि राज्यातील तरुणांचे रोजगार हिरावले जात आहेत,'' असा टोला वडेट्टीवार यांनी लगावला.

### मोदींच्या वर्धा दौऱ्यावरही भाष्य

नरेंद्र मोदींच्या आजच्या वर्धा दौऱ्यासंदर्भातही फडणवीसांनी गुरुवारी रात्री प्रतिक्रिया नोंदवली. ''पंतप्रधान नरेंद्र मोदी यापूर्वीसुद्धा दौऱ्यावर आलेले आहे. विश्वकर्मा ही अतिशय सुंदर योजना आहे. सगळ्या लाभार्थ्यांच एक प्रकारच संमेलन वर्ध्यात होत आहे. यानंतर सुद्धा अनेक दौरे महाराष्ट्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पाहायला मिळतील,'' असं फडणवीस म्हणाले.

## महाराष्ट्रातील पहिला सेमी कंडक्टर प्रकल्प नवी मुंबईत सुरु; ३६ हजार ५७३ कोटींची गुंतवणूक

**■नवी मुंबई । प्रतिनिधी:**

राज्यातील पहिल्या सेमी कंडक्टर प्रकल्पाचं उद्घाटन करण्यात आलं. नवी मुंबईतील महापे इथे पार पडलेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित होते. RRP इलेक्ट्रॉनिक कंपनीचा हा प्रकल्प आहे. यातून राज्यात २ टप्प्यांत मिळून तब्बल ३६ हजार ५७३ कोटींची गुंतवणूक केली जाणार आहे. तर पहिल्या टप्प्यात ४ हजार नोक-या उपलब्ध होणार आहेत. RRP हा मराठी उद्योजकाचा महाराष्ट्रातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनं बनवणारा अग्रगण्य समूह असून, या प्रकल्पांतर्गत इस्त्रायल आणि स्पेनमधील कंपन्यांचाही सहभाग आहे.



जगाच्या संपूर्ण व्यवस्थेचा भाग व्हायचा असेल तर ही चीप इंडस्ट्री भारतात असावीच लागेल. केंद्र सरकारच्या मदतीने महाराष्ट्र हे पहिलं राज्य आहे की ज्यांनी स्वत:ची इको सिस्टम तयार केली. आज इलेक्ट्रॉनिक्स आणि डिजिटल सिस्टम आपल्या जीवनाला बदलतेय. एआय मुळे आपली क्षमता बदलली आहे. डीजीटल वर्ल्ड आणि एआय आपले जीवन बदलते आहे. त्यामुळे अग्रभागी राहायचे तर ही टेक्नॉलॉजी वापरावी लागेल. भारताने डिझाईन क्षेत्र काबीज केलं आहे त्याला सपोर्ट करणारे तंत्रज्ञान आहे. सेमी कंडक्टर क्षेत्र हे ही सस्टेनेबल नसल्याचं म्हटलं जातं मात्र आज सुरू करण्यात आलेल्या प्रकल्पात हेपाण्याचा पुनर्वापर करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

महाराष्ट्रातल्या पहिल्या सेमी कंडक्टर प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन आज नवी मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या उपस्थितीत करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. सेमी कंडक्टर चीप हा प्रकल्प आरआरपी ग्रुप ऑफ कंपनीज यांच्यामार्फत हा उभा करण्यात येत आहे. दोन टप्यात हा प्रकल्प होणार असून इटली आणि फ्रान्स सरकारचा यामध्ये २७% वाटा आहे.

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात २४ हजार ५३८ कोटी एवढी गुंवतणूक करण्यात येणार आहे. दोन्ही टप्यातील घटकाची महाराष्ट्रातील एकूण गुंतवणूक ३६ हजार ५७३ कोटी एवढी असणार आहे. राज्यात उद्योग क्षेत्राला कॅपिटल सबसिडी आहे. रेड कार्पेट सुविधा आहेत. एक खिडकी योजना असल्यामुळे उद्योग क्षेत्र विकसित होत आहे. एमएमआर क्षेत्रच नव्हे तर गडचिरोली सारख्या भागातही औद्योगिक क्षेत्र विस्तारत असल्याचंही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

सेमी कंडक्टर प्रकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्राला हातभार लागणार आहे. औद्योगिक क्षेत्रासाठी महत्वाचा प्रकल्प आहे. १२ हजार कोटींची गुंतवणुक असलेल्या या प्रकल्पातून ४ हजार रोजगार निर्मिती होईल. महाराष्ट्र देशासाठी नेतृत्व करेल असं उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले.

# गरोदरपणात मळमळ उलट्या थांबवण्यासाठी घरगुती उपाय

**१. काळे मीठ लावून आले खा**

आल्यामध्ये काळे मीठ टाकून दाताखाली दाबल्याने या समस्येवर मात करता येते. खरं तर, आल्याचा अर्क मळमळ होण्याची भावना कमी करतो, तर मीठ पोटात आणि अन्न नळीतील ॲसिड तटस्थ करते. यामुळे मळमळ आणि उलट्या होत नाहीत.

**२. पुदिन्याची चटणी खा**

पुदिन्याची चटणी खाल्ल्यास किंवा त्याची पाने चघळल्याने गर्भधारणेची ही समस्या कमी होण्यास मदत होते. वास्तविक, पुदीनामध्ये थंड आणि आरामदायी गुणधर्म आहेत. यासह, ते पाचक एन्झाईम्सला देखील प्रोत्साहन देते, ज्यामुळे गरोदरपणात मळमळ आणि उलटीची समस्या कमी होते.



**३. लिंबाचा रस प्या किंवा लिंबू खा**

लिंबाचा रस प्यायल्याने गर्भधारणेची ही समस्या प्रभावीपणे कमी होऊ शकते. जर रस प्यावासा वाटत नसेल तर लिंबू कापून त्यावर काळे मीठ लावून चाटावे. त्यातील व्हिटॅमिन सी आणि सायट्रिक ॲसिड मळमळ कमी करण्यास मदत करतात.

**४. वेलची खा**

वेलचीमध्ये पाचक एन्झाईम्स वाढवण्याचा गुणधर्म असतो. हे चघळल्याने पोटाचा त्रास होत नाही आणि मळमळापासूनही आराम मिळतो. त्यामुळे गरोदरपणात या सर्व गोष्टी तुम्हाला त्रास देत असतील तर तुम्ही या घरगुती उपायांची मदत घेऊ शकता.



# वजन नियंत्रित ठेवायचंय?

गाजर हे आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे अनेकदा डॉक्टरसुद्धा गाजराचा आहारात समावेश करण्याचा सल्ला देतात. गाजरमध्ये बीटा-कॅरोटीन असते जे एक अँटिऑक्सिडेंट असते. ज्याचा शरीराला खूप फायदा असतो. जर तुम्ही दररोज गाजराचा ज्युस पिलात तर याचा तुम्हाला पुरेपुर फायदा होणार. आज आपण याविषयीच जाणून घेणार आहोत.

दररोज एक ग्लास गाजराचा ज्युस पिणे आरोग्यासाठी उत्तम असते.

गाजराचा ज्युस पिल्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. गाजर हे बीटा-कॅरोटीनचा उत्तम स्त्रोत आहे, ज्यामुळे शरीरात व्हिटॅमिन ए मध्ये बदलते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढते.

दररोज गाजराचा ज्युस पिल्याने वजन सुद्धा नियंत्रित राहण्यास मदत होते. त्यामुळे डाएट करणाऱ्यांनी आवर्जून गाजराचा ज्युस प्यावा.

एवढंच काय तर गाजराचा ज्युस पचनशक्तीसुद्धा कमी करते.

याशिवाय गाजराचा ज्युस पिल्याने रक्तातील साखरेची पातळी कमी होते आणि कोलेस्ट्रॉलची लेव्हलही कमी होते.

तसेच गाजरातील बीटा-कॅरोटीनसुद्धा डोळ्यांचं आरोग्य सुदृढ ठेवते.

याशिवाय कर्करोगग्रस्त रुग्णांनाही डॉक्टर गाजराचा ज्युस पिण्याचा सल्ला देतात.



# कॉफी व लिंबू प्यायल्याने वजन होते कमी?

आपल्यापैकी अनेकजण स्वतः वजन कमी करण्याच्या मोहिमेवर असतील, अगदीच नाही तर अशा कोणाला ओळखत असतील जे आपल्या वजनाला घेऊन चिंतेत आहेत. अशा मंडळींना वजनापेक्षा जास्त वजन कमी करण्यासाठी दिल्या जाणाऱ्या सल्ल्यांचा जास्त वैताग येतो. प्रत्येकाकडून वेगवेगळ्या गोष्टी ऐकताना नेमकं करावं काय हे आपल्यालाही अनेकदा कळत नाही. अशावेळी सर्वात सोपा उपाय म्हणजे डॉक्टरांचा सल्ला. आज आपण तज्ज्ञ वजन कमी करण्यासाठी ऑनलाईन दिलेल्या सल्ल्याची डॉक्टरांनी केलेली पडताळणी जाणून घेणार आहोत. हा व्हायरल सल्ला म्हणजे कॉफी व लिंबू एकत्र पिणे. आजवर आपण लेमन टी हा प्रकार ऐकला असेल पण लेमन कॉफी म्हणजे काय व खरंच याचा फायदा वजन कमी करण्यासाठी होऊ शकतो का हे जाणून घेऊयात.

**कॉफीच्या सेवनाने वजन कमी होते का?**

कविता सांगतात की, तुम्ही एक पॅकेट चिप्स खाण्याआधी जर एक ग्लास पाणी प्यायलात तर तुमची भूक झटपट कमी होते. जर तुम्ही दोन ग्लास पाणी प्यायलात तर तुम्हाला काही खाण्याची इच्छाही होत नाही. ७० ते ८० या दशकात अनेक मॉडेल्स रॅम्प वॉकआधी कॉफी प्यायच्या.

कॉफीमुळे आपल्या शरीरातील बेसल मेटाबॉलिक रेट (BMR) वाढतो. कॅफिन न्यूरोट्रांसमीटर एडेनोसिन ला ब्लॉक करण्याचे काम करतो तसेच डोपामाइन या न्यूरोट्रांसमीटरला वाढवण्यास मदत करते. जर आपल्याला मेटाबॉलिक रेट अधिक वाढवायचा असेल तर एका दिवसात अधिकाधिक कॉफीचे सेवन करावे लागेल पण असे केल्याने आपल्या स्वास्थ्यावर अगदीच विपरीत परिणाम होऊ शकतो.

**लिंबाच्या सेवनाने वजन कमी होते का?**

वजन कमी करण्यासाठी अनेक तज्ज्ञ लिंबू पाणी पिण्याचा सल्ला देतात. कविता सांगतात की, लिंबामध्ये व्हिटॅमिन सी, अँटी ऑक्सिडंट्स, फोलेट व अन्य खनिजे असतात, यामुळे आपल्या शरीराला डिटॉक्स करण्यात मदत होऊ शकते. याशिवाय कोलेस्ट्रॉल कमी करण्यास सुद्धा यामुळे मदत होऊ शकते. लिंबू पाणी प्यायल्यावर त्यातील क्षार आपला पोटाच्या विकारांपासून बचाव करू शकतात. तर शरीर हायड्रेटेड ठेवण्यासाठी सुद्धा याची मदत होते.

**कॉफी व लिंबू प्यायल्याने वजन होते कमी?**

दरम्यान, कॉफी व लिंबू यांचे अलिप्त फायदे असले तरी एकत्र त्यांचे सेवन केल्याने तुमचे वजन कमी होईलच याची काही शाश्वती नाही. आहारतज्ज्ञ कविता देवगन यांनी इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, कॉफी व लिंबू आपल्याला वजन कमी करण्यास मदत करू शकतील याचे काही ठोस पुरावे नाहीत पण या पेयाच्या सेवनाने आपली भूक नियंत्रणात राहते किंबहुना कमी होते. जेव्हा तुम्ही कॅफिनचे सेवन करता तेव्हा अधून मधून लागणारी छोटी भूक कमी होते व सतत खात राहण्याची इच्छा मिटते. त्यामुळे व्हायरल ट्रिक्सच्या अंधानुकरणाला बळी पडू नका.

# पनीर खाण्याचे फायदे

प्रत्येक जण नवीन वर्षात नवनवीन निर्धार करत असतात. अशात अनेकजण आरोग्याच्या दृष्टीने वजन कमी करण्याचाही निर्धार करतात. आज आम्ही तुम्हाला वजन कमी करण्यासाठी एक सोपा उपाय सांगणार आहोत.

वजन कमी करायचं असेल तर तुम्ही पर्याय म्हणून पनीर खाऊ शकता. कारण पनीर हा उत्तम पर्याय आहे. चला तर सविस्तर जाणून घ्या.

पनीर हा अनेकांना आवडणारा पदार्थ आहे. अनेकदा जेवणाच्या अनेक मेन्युमध्ये पनीरचा समावेश केला जातो. पनीर हा आरोग्याच्या दृष्टीनेही तितकाच फायदेशीर आहे. शाकाहारी लोकांसाठी पनीर हा प्रोटीन देणारा उत्तम पर्याय आहे.

त्यात जर तुम्ही वजन कमी करण्याचा विचार करत असाल तर प्रोटीन तुम्ही खायलाच हवं. पनीरमध्ये प्रोटीन्ससह, व्हिटॅमिन्स, कॅल्शियम आणि फॉस्फरस असतात जे शरीरासाठी खूप फायदेशीर असतात.



**पनीर खाण्याचे फायदे**

पनीरमध्ये प्रोटीनचे प्रमाण अधिक असते. जर तुम्ही आहारात पनीरचा समावेश करत असाल तर उत्तम पर्याय आहे.

पनीर हे लो कॅलरीयुक्त पदार्थ आहे. त्यामुळे कमी कॅलरी असलेले पनीर वजन कमी करण्यासाठी फायदेशीर आहे.

जर तुम्ही डाएट करत असाल तर तुम्ही पनीर खाऊ शकता. शरीराला हेल्दी फॅट देण्यास पनीर उत्तम पर्याय आहे.

पनीरमध्ये असलेले कॉंजुगेटेड लिनोलिक ॲसिड चरबी जाळण्यास मदत करते. ज्यामुळे वजन आपोआप कमी होते.

पनीर खाल्याने भूक कमी होते त्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

# कमी रक्तदाबाच्या समस्येवर दूध ठरेल रामबाण उपाय

रोजच्या धावत्या आयुष्यात दोन मिनिट बसायला ज्यांना वेळ नाही त्यांना टेन्शन घेऊ नका असं आम्ही सांगणार नाही. मुळात कोणी सांगितल्याने तुमचा तणाव जाणार नाही त्यासाठी आपणच स्टेप बाय स्टेप काम करणे गरजेचे आहे. मात्र हे तणाव विनाकारण रोगांना आमंत्रण देतात त्यातील एक सर्वात घातक रोग म्हणजे ब्लड प्रेशरमध्ये असंतुलन. साधारण ९०/६० mmHg ते १२०/८० mmHg दरम्यान असणारा रक्तदाब हा परफेक्ट मानला जातो. याहून अधिक किंवा कमी रक्तदाब हा आरोग्यासाठी घातक असतो. जर का आपल्याला वारंवार टेन्शन घेतल्याने सतत रक्तदाब कमी झाल्याची तक्रार सतावत असेल तर आज आपण एक घरगुती सोपा उपाय पाहणार आहोत. लक्षात घ्या तणाव सोडून आनंदी राहणे हा रक्तदाबावरील सर्वात सोपा उपाय आहे मात्र इन्स्टंट त्रास होत असेल तर थंड दूध हा तुमचा घरचा रामबाण उपाय ठरेल. हाडांची मजबुती ते शरीराला आवश्यक पोषक तत्वे मिळण्यासाठी गरम किंवा कोमट दूध घेण्याचा सल्ला दिला जातो. मात्र कमी रक्तदाबाच्या समस्येवर थंड दुधाचे सेवन अधिक फायदेशीर ठरते.

**थंड दुधाचे फायदे –** थंड दुधात पोटेशियम, फॉस्फोरस, विटामिन व कॅल्शियमचे प्रमाण भरपूर असते. अमेरिकन हार्ट एसोसिएशनच्या माहितीनुसार रक्तदाब कमी झाल्यास थंड दुधातील पोटॅशियम प्रेशर संतुलित करण्यास मदत करते थंड दुधामुळे शरीर हायड्रेटेड राहण्यास मदत होते उपवासाच्या दिवशी विशेषतः थंड दूध प्यावे ज्याने वारंवार भूक लागणे बंद होते. याशिवाय थंड दुध चेहऱ्याला लावल्यास त्वचेला सुद्धा फायदा होतो. नॅशनल इंस्टीट्यूट ऑफ हेल्थ च्या माहितीनुसार थंड दुधातील कोलाईन आपल्या शरीराला आवश्यक पोषक तत्व देतात ज्यामुळे स्मरणशक्ती व मूड चांगला राहण्यास मदत होते. मूड हलका राहिल्यास लॉन्ग टर्म मध्ये सुद्धा तणाव कमी व्हायला व रक्तदाब संतुलित राहायला मदत होते.




# दुधात चिमूटभर मीठ टाकून प्यायल्यास चेहऱ्याला खाज सुटते का?

पारंपरिक पदार्थ की पौष्टिक अन्नपदार्थ अनेकदा यावरून वाद होताना दिसतात; ज्यामुळे आपले आरोग्य खरोखरच निरोगी काय आहे याबद्दल गोंधळ उडू शकतो. अलीकडेच, एका पॉडकास्ट होस्टने त्यांच्या पाहुण्यांशी संवाद साधला आणि मिठासह दुधाचे सेवन केल्याने चेहऱ्यावर खाज सुटणे, बद्धकोष्ठता, यकृताची जळजळ, पिवळसर लघवी यांसह विविध आरोग्य समस्या उद्भवू शकतात का, असा प्रश्न विचारला. त्यावर कन्टेन्ट क्रिएटर क्रिश अशोक यांनी संशय व्यक्त केला आणि हे दावे फेटाळून लावले. तसेच लोकांनी अन्न संयोजनाबद्दल चुकीच्या माहितीला बळी पडू नये, असे आवाहनसुद्धा केले आहे.

बंगळुरूच्या अपोलो स्पेक्ट्रा हॉस्पिटलच्या डॉक्टर अमृत गुरुराज येलसांगीकर (एमबीबीएस, एमडी, जनरल मेडिसिन, डीएनबी, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी) म्हणाल्या की, मिठासह दुधाचे सेवन करणे आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरू शकते ; या दाव्याचे समर्थन करणारे कोणतेही वैज्ञानिक पुरावे आजवर उपलब्ध नाहीत. हे दावे बहुतेक वेळा वैज्ञानिक संशोधनाऐवजी विश्वासांवर आधारित असतात. सल्लागार आहारतज्ज्ञ व सर्टिफाईड डायबिटीज एज्युकेटर कनिक्का मल्होत्रा म्हणाल्या की, मीठ घातलेले दूध प्यायल्याने यकृताची जळजळ, बद्धकोष्ठता किंवा चेहऱ्याची जळजळ यांसारख्या आरोग्याच्या समस्या उद्भवतात हा दावा चुकीचा आहे. मीठयुक्त चीज, पास्ता सॉस, दही-भात, लस्सी यांसारख्या विविध पदार्थांमधील मीठ-दूध यांचे मिश्रण अनेक पौष्टिक फायदे देऊ शकते आणि ती बाब सोडियमच्या सेवनाची हमी देते.

**दुग्धजन्य पदार्थ आणि मीठ यांच्या मिश्रणास आपले शरीर कसे प्रतिसाद देते?**

डॉक्टर अमृत गुरुराज येलसांगीकर सांगतात की, शरीर दुग्धजन्य पदार्थ, मीठ दोन्ही स्वतःच पचवते. दुग्धजन्य पदार्थ कॅल्शियम, प्रथिने, चरबी देतात आणि मीठ शरीराला सोडियम प्रदान करते, जे शरीराला आवश्यक असलेले इलेक्ट्रोलाइट आहे. संयमाने सेवन केल्यावर, हे मिश्रण पचन होण्यास मदत करते. त्यामुळे या मिश्रणाने आरोग्य बिघडण्याची कोणतीही शक्यता नाही. पण, ही बाब लक्षात ठेवणे गरजेचे आहे की, मिठाच्या अतिसेवनामुळे मूत्रपिंडावर ताण येऊ शकतो. कालांतराने त्याचा कॅल्शियम संतुलनावर परिणाम होऊ शकतो; ज्यामुळे दीर्घकालीन आरोग्य समस्या उद्भवू शकतात. दुधात मीठ टाकल्याने पचनावर परिणाम किंवा त्याचा शरीरावर नकारात्मक परिणामसुद्धा होत नाही. तसेच या दाव्यांचा कोणताही पुरावा नसला तरीही वैयक्तिक निवडींवर आधारित, दुधात एक चिमूटभर मीठ टाकण्याने दुधाचा ताजेपणा टिकून राहू शकतो; पण जास्त प्रमाणात मीठ टाकल्यास चवसुद्धा बदलू शकते.

# साखर तुमच्या शरीराला आतून पोखरतेय, ही लक्षणे वेळीच ओळखा

साखर हा पदार्थ असा आहे जो न खाण्याचा विचार सहसा कुणीही करत नाही. साखरेचा वापर असंख्य खाण्यात केला जातो. अनेक पदार्थांमध्ये साखर हा महत्वाचा घटक असतो. दिवसभरात कोणत्या ना कोणत्या कारणाने साखर पोटात जाते. मात्र साखरेचं अधिक प्रमाणातील सेवन हे शरीरासाठी घातक असतं. या साखरेमुळे अनेक आरोग्याच्या समस्या डोकं वर करतात. एक्सपर्टच्या म्हणण्यानुसार, कमी प्रमाणात साखर खाल्याने काही फरक नाही. मात्र अधिक साखरेचं सेवन हे आरोग्यासाठी घातक आहे. दिवसाला किती चमचे साखर खावी? याबद्दल देखील एक्सपर्ट काय सांगतात हे समजून घेणे गरजेचे आहे. साखर तुमच्या शरीरात कशा प्रकारे कार्य करते हे समजून घेणे देखील गरजेचे आहे. सहा लक्षणांच्या माध्यमातून तुम्हाला शरीरात साखरेची पातळी वाढल्याची माहिती मिळते. त्यामुळे या लक्षणांकडे अजिबात दुर्लक्ष करू नका.




**दररोज किती साखर खाणे योग्य?**

एक्सपर्टच्या सल्ल्यानुसार, दररोज ६ चमचे साखर खाणे आरोग्यासाठी हानिकारक नाही. मात्र यापेक्षा सर्वाधिक साखर खाणे तुमच्या शरीरासाठी घातक ठरू शकते. सर्वाधिक साखर खाल्यामुळे लठ्ठपणा, हृदयाचा आजार, कोलेस्ट्रॉल वाढण्याची शक्यता, अल्झायमर सारखे आजार होण्याची दाट शक्यता आहे. तुमच्या शरीरामार्फत काही संकेत आणि लक्षणांच्या माध्यमातून तुम्हाला शरीरातील साखरेच्या पातळीची जाणीव होईल.

**स्नायू आणि सांधेदुखी –** कायम तुम्हाला स्नायू आणि सांधेदुखीचा त्रास असेल तर अधिकच गोड खाणे बंद करा. एवढंच नव्हे तर शरीरात साखरेचं प्रमाण वाढल्यास गाठ, मोतिबिंदू, हृदयरोग यासारखे आजार होतात. ज्याचा तुमच्या शरीरावर मोठा परिणाम होतो. साध्यांना आणि स्न्यायूला त्रास होणे.

**एनर्जी लेवल वाढते किंवा कठीण होते –** ग्लुकोज तुमच्या शरीरात ऊर्जा निर्माण करते, त्यामुळे तुमच्या रक्तातील साखरेची पातळी योग्य प्रमाणात ठेवणे फार महत्वाचे आहे. जेव्हा तुम्ही गोड खातात, तेव्हा स्वादुपिंड पेशींमध्ये ग्लुकोज आणण्यासाठी इन्सुलिन सोडते. ज्यामुळे तुम्हाला ऊर्जा मिळते. एकदा चक्र संपले की, तुम्हाला उर्जेची पातळी कमी झाल्याचे जाणवते कारण तुमचे शरीर अधिक साखरेची इच्छा बाळगते.

**त्वचेवर होतो परिणाम –** ज्या पदार्थांमध्ये साखरेचं प्रमाण सर्वाधिक असतं. त्यामुले शरीरातील इंसुलिनचं प्रमाण वाढतं. यामुळे ग्लायकेशनची प्रक्रिया सुरू होते. ग्लुकोज तुमच्या रक्तात प्रवेश करतो तसे तुम्हाला शरीराला सूज येणे किंवा त्वचेचे रोग होणे यासारखे समस्या जाणवतात. हे इंसुलिन त्वचेतील तेल ग्रंथींची क्रिया वाढवू शकते आणि दाहक प्रक्रिया सक्रिय करू शकते.

**वजन वाढणे –** HCFच्या रिपोर्टनुसार, जास्त साखर खाल्यामुळे वजन वाढते. वजन वाढणं हे खूप कमी लोकांसाठी सुखावणारं असतं. वजन वाढल्यामुळे कायमच आरोग्याच्या वेगवेगळ्या समस्या डोकं वर करतात. अनेकांच्या आवडीचे पदार्थ केक, आइस्क्रिम, चॉकलेटमुळे वजन वाढतं. ज्यामुळे शरीराला इतर व्याधी जडतात.

**दाताचं दुखणं –** गोड पदार्थ पोकळी आणि दात किडण्यास प्रोत्साहन देतात. तथापि, दात किडण्यास कारणीभूत साखर नसून खाल्ल्यानंतर दातांवर पडणारा अन्नाचा कचरा असतो. नीट ब्रश न केल्यास, अन्नाच्या कचऱ्यामुळे तुमच्या दातांवर प्लेक तयार होऊ शकतो. हे दाताची कठीण पृष्ठभाग नष्ट करते, लहान छिद्रे सोडते.

**सतत सर्दी आणि तापाचा त्रास जाणवणे –** जास्त साखर खाणे तुमची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत करू शकते. फ्लूशी लढण्यासाठी तुमच्या शरीराला आवश्यक असलेल्या व्हिटॅमिन सीची रासायनिक रचना ग्लुकोजसारखी असते. व्हिटॅमिन सी शोधण्याऐवजी आणि कार्य करण्याऐवजी, तुमची रोगप्रतिकारक प्रणाली फ्लूच्या जीवाणूंविरूद्ध शून्य शक्ती असलेले ग्लुकोज घेते.

# संपादकीय

## भाजपचे हरियाणातील 'काँग्रेसी वळण'



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

शिस्तप्रिय पक्ष अशी प्रतिमा भाजपने जपली, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्याकडे पक्षाचे नेतृत्व आल्यापासून पक्षातील शिस्त अधिकच कडक झाली. नेतृत्वाच्या विरोधात बोलणे सोडा, खासगीतही मतप्रदर्शन करण्याची कोणाची टाप राहिली नाही. मुख्यमंत्री किंवा मंत्रीपदावरून रातोरात हटविण्यात आले तरी 'हू' की 'चू' करण्याची हिम्मत कोणी दाखवली नाही. मोदी-शहा यांच्या गुजरातमध्ये विजय रुपाणी यांच्यासह सर्व मंत्रिमंडळाला नारळ देण्यात आला, कोणत्याही मंत्र्याचा नवीन मुख्यमंत्र्यांच्या मंत्रिमंडळात फेरसमावेश झाला नाही. नितीन पटेल यांच्यासारख्या ज्येष्ठ मंत्र्यालाही घरी बसविण्यात आले. पण कोणीही नेतृत्वाच्या निर्णयाच्या विरोधात प्रतिक्रिया व्यक्त करण्याचे धाडस केले नाही. जमिनीच्या कथित गैरव्यवहारावरून एकनाथ खडसे यांचा मंत्रीपदाचा राजीनामा घेण्यात आला.

त्यानंतर खडसे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात तोफ डागली; पण त्याची किंमत खडसे यांना आजही चुकवावी लागत आहे. खडसेंचे जावई 'ईडी'चा पाहुणचार घेऊन आले. उत्तराखंडमध्ये सहा महिन्यांत तीन मुख्यमंत्री बदलले पण कोणी काही विरोधी भूमिका घेतली नाही. राजस्थानमध्ये वसुंधराराजे यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याला मुख्यमंत्रीपद नाकारले तरीही त्यांनीही केंद्रीय नेतृत्वाबद्दल उघडपणे नाराजी व्यक्त केली नव्हती. मोदी-शहा यांची जरबच तेवढी होती. एवढी शिस्त असूनही लोकसभा निवडणुकीत भाजपच्या खासदारांचे संख्याबळ ६३ने घटले. भाजपची गाडी २४०पर्यंत अडकल्याने राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील मित्रपक्षांवर सारी भिस्त आली. भाजपचा जनाधार आटला तसा पक्षातील नेतृत्वाचा धाकही कमी झाला की काय, अशी शंका घेण्यासारखे प्रसंग हरियाणात घडत आहेत.

हरियाणा विधानसभा निवडणुकीचे वारे सध्या वाहात आहेत. भाजपपुढे सत्ता कायम राखण्याचे कडवे आव्हान उभे ठाकले आहे. लोकांची सरकारबद्दलची नाराजी वाढल्यानेच लोकसभा निवडणुकीपूर्वी मनोहरलाल खट्टर यांना मुख्यमंत्रीपदावरून हटवून नायबसिंह सैनी यांची मुख्यमंत्रीपदी निवड केली. 'विधानसभा निवडणुकीत सैनी यांचाच चेहरा मुख्यमंत्रीपदासाठी असेल,' असे पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने जाहीर केले. सहा महिने झाले तरी सैनी अजूनही स्थिरस्थावर होऊ शकलेले नाहीत. भाजपच्या अडचणींमध्ये वाढ झाली असतानाच हरियाणा भाजपमधील ज्येष्ठ नेते अनिल विज यांनी थेट मुख्यमंत्रीपदावर दावा केला आहे. विज हे एकमेव नव्हेत.

केंद्रीय मंत्री राव इंद्रजीतसिंह यांनीही उघडपणे मुख्यमंत्रीपदाची इच्छा व्यक्त केली आहे. भाजपच्या मोदी - शहांच्या कारकीर्दीत प्रथमच पक्षातील कोणी नेत्याने उघडपणे मुख्यमंत्रीपदावर दावा केला आहे. यापैकी राव इंद्रजीतसिंह हे काँग्रेसमधून भाजपवासी झाल्याने त्यांच्या अंगी काँग्रेस संस्कृती कदाचित कायम असावी. पण विज तर मूळचे भाजपचे. भाजपचे सर्वात ज्येष्ठ आमदार. २०१४ मध्ये भाजपला सत्ता मिळाली तेव्हाच अनिल विज यांचे नाव मुख्यमंत्रीपदासाठी घेतले जात होते. पण गेली दहा वर्षे त्यांना पक्षात दुय्यम भूमिकेत वावरावे लागले. गृहसारखी महत्त्वाची खाती भूषवताना विज नेहमीच वादात राहिले. विक्षिप्त स्वभावाच्या विज यांनी आपल्या विधानांवरूनही पक्षाला अडचणीत आणले होते. सैनी यांची मुख्यमंत्रीपदावर निवड होतानाही विज यांनी आक्षेप घेतला होता. यामुळेच बहुधा मंत्रिमंडळात त्यांना स्थान देण्यात आले नव्हते. पण आता 'मला मुख्यमंत्री करण्यासाठी भाजपला मत द्या' असा प्रचारच केंद्रीय नेतृत्वाला डावलून विज यांनी आरंभला आहे. याआधी जम्मू आणि काश्मीरमध्ये, जाहीर केलेली उमेदवारांची यादी काही तासांतच मागे घेण्याची नामुष्की भाजपवर आली होती. हेदेखील थेट नेतृत्वालाच आव्हान होते. येडियुरप्पा किंवा वसुंधराराजे यांच्यासारख्या दिग्गजांचा पद्धतशीरपणे काटा काढणाऱ्या भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाला हरियाणा किंवा जम्मू आणि काश्मीरमध्ये आव्हान मिळते आहे. भाजपचे हे काँग्रेसीकरण तर नाही ना? नेतृत्वाची जरब कमी झाली असावी वा नेतेमंडळींची हिम्मत वाढली असावी. काँग्रेसप्रमाणे भाजपच्या मुख्यालयात समर्थकांकरवी कोणी झिंदाबादचे नारे दिले नाहीत वा नेतृत्वासमोर शक्तिप्रदर्शन केले नाही. पण भाजपमध्ये आतापर्यंत दबला गेलेला आवाज हळूहळू बाहेर पडू लागला आहे.

# शिक्षणावर जनरेटिव्ह एआयचा प्रभाव



जनरेटिव्ह आर्टिफिशियल इंटेलिजन्स (जनरेटिव्ह एआय) विविध क्षेत्रांमध्ये झपाट्याने बदल करत आहे आणि शिक्षणही त्याला अपवाद नाही. जसजसे आपण डिजिटल युगात मार्गक्रमण करत आहोत, तसतसे शिक्षणाकडे जाणारे पारंपारिक दृष्टिकोन बदलत आहेत. मजकूर, प्रतिमा आणि अगदी संगीत यांसारखी नवीन सामग्री तयार करण्यास सक्षम ठरू शकणाऱ्या जनरेटिव्ह एआय प्रणालींमुळे शिक्षणातही नाविन्यपूर्ण उपाय योजले जाऊ शकतात. जनरेटिव्ह एआयमुळे 'विद्यादाना'चा अनुभव आणि शिकवलेल्याचा वापर करण्याच्या पद्धती, यांत बदल होत आहेत.. हे बदल कोणते?

**व्यक्ति-निहाय शिक्षण अनुभव**

जनरेटिव्ह एआयचा शिक्षणातील सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे वैयक्तिकीकृत किंवा व्यक्ति-निहाय शिक्षण अनुभव तयार करण्याची क्षमता. पारंपारिक शैक्षणिक मॉडेल्स बऱ्याचदा सब घोडे बारा टके असा सपाटीकरणाचा दृष्टिकोन अवलंबतात, हे प्रत्येक विद्यार्थ्याच्या विविध शिक्षण गरजा पूर्ण करू शकत नाही. याउलट जनरेटिव्ह एआयच्या मदतीने शैक्षणिक सामग्री तयार करतेवेळीच शिकणाऱ्याची प्रगती आणि कमकुवतता यांचे विश्लेषण करून पुढले टप्पे गाठले जाऊ शकतात.

एआय अल्गोरिदम विद्यार्थ्याला विशिष्ट विषय किती चांगल्या प्रकारे समजतो याचे मूल्यांकन करू शकतात आणि विद्यार्थ्यार्ला जड जात असलेल्या क्षेत्रांसाठी अतिरिक्त संसाधने किंवा स्वाध्याय सुचवू शकतात. कठीण विषयांवरून विद्यार्थ्यांचे लक्षच उडून जाण्याऐवजी, विद्यार्थी सतत लक्ष देत राहावेत आणि प्रेरित राहावेत, यासाठी जनरेटिव्ह एआयचा वापर होऊ शकतो. त्यामुळे ज्ञानाची चांगली धारणा होऊ शकेल, निकालांतही फरक पडेल.

**परस्परसंवादी आणि इमर्सिव्ह सामग्री**

व्हर्च्युअल सिम्युलेशन, गेमिफाइड लर्निंग मॉड्यूल्स आणि ऑगमेंटेड रिऍलिटी यांसारखी परस्परसंवादी आणि इमर्सिव्ह शैक्षणिक सामग्री जनरेटिव्ह एआयच्या वापराने तयार केली जाऊ शकते. ही साधने केवळ विद्यार्थ्यांना अधिक गुंतवून ठेवत नाहीत तर अमूर्त संकल्पना दृश्यमान करून जटिल विषय समजून घेण्यास मदत करतात. उदाहरणार्थ, जीवशास्त्राचा विद्यार्थी व्हर्च्युअल रिऍलिटी सिम्युलेशनद्वारे मानवी शरीराचा 'आतून' शोध घेऊ शकतो, हा इमर्सिव्ह अनुभव पारंपारिक वर्गात अशक्य आहे.

**वर्धित शिकण्याची सुलभता**

शिक्षण अधिक सुलभ बनवण्यातही जनरल एआय महत्त्वाची भूमिका बजावत आहे. त्यातून भौगोलिक, भाषिक आणि आर्थिक अडथळे दूर करू शकते, शैक्षणिक वातावरण यामुळे अधिक समावेशक होऊ शकते. जनरेटिव्ह एआय-समर्थित भाषांतर साधनांमुळे अन्यभाषकांना त्यांच्या पसंतीच्या भाषेतून अभ्यासक्रम सामग्री समजून घेण्यास मदत होऊ शकते, विविध भाषिक पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांसाठी सर्वसमावेशक वातावरण यामुळे तयार होते. ही साधने व्याख्यानांचे रीअल-टाइम भाषांतर, व्हिडिओसाठी सबटायटल्स आणि पाठ्यपुस्तकांचे भाषांतरदेखील देऊ शकतात, ज्यामुळे दर्जेदार शिक्षण जागतिक पातळीवर प्रवेशयोग्य बनते.

**सहाय्यक तंत्रज्ञान**

शारीरिक विकलांगता असलेल्या विद्यार्थ्यांसाठी तर जनरेटिव्ह एआय हा 'गेम चेंजर' आहे. 'स्पीच-टू-टेक्स्ट' आणि 'टेक्स्ट-टू-स्पीच' उपयोजने दृष्य किंवा श्रवणदोष असलेल्या विद्यार्थ्यांपर्यंत शैक्षणिक साहित्य अधिक सहजतेने पोहोचवण्यात मदत करतात. शिवाय, एआय-शक्तीवर चालणारी साधने वेगळ्या गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या विशिष्ट परिस्थितीनुसार अनुकूल सामग्री तयार करू शकतात, ज्यामुळे त्यांना यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेला पाठिंबा मिळण्याची शक्यता वाढते.

**सुव्यवस्थित प्रशासकीय प्रक्रिया**

जनरेटिव्ह एआयचा प्रामुख्याने शिकणाऱ्यांना थेट फायदा होत असताना, ते शिक्षणामधील प्रशासकीय प्रक्रिया सुव्यवस्थित करून एकूण शैक्षणिक वातावरणाचा दजार्देखील वाढवते. नित्याची दैनंदिन कार्ये स्वयंचलित करून, शिक्षकांचे लक्ष अध्यापनावर अधिक आणि प्रशासनावर कमी राहावे, यासाठी जनरेटिव्ह एआयसारखा साथीदार नाही. अगदी ह्यपेपर तपासण्याह्नसारखे कामही यातून होऊ शकते.

एआय-संचालित साधने बहुपयार्यी प्रश्न किंवा विवक्षित उत्तरच अपेक्षित असलेल्या अन्य प्रश्नांच्या वस्तुनिष्ठ मूल्यांकनांसाठी उत्तर-तपासणीचे काम स्वयंचलित करू शकतात, यामुळे शिक्षकांना याकामी घालवणारा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल. शिवाय, जनरेटिव्ह एआय विद्यार्थ्यांना त्वरित, तपशीलवार अभिप्राय देऊ शकतो, त्यांच्या चुका नेमक्या दाखवून देऊ शकतो आणि सुधारणेसाठी क्षेत्र सुचवू शकतो. असा त्वरित प्रतिसाद शिकण्याच्या प्रक्रियेला गती देतो आणि सुधारात्मक कृतीदेखील त्वरित करण्यास उद्युक्त करतो.

अभ्यासक्रमात सुधारणा करणे, तो अद्ययावत करणे हे शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांचे कामदेखील जनरेटिव्ह एआयमुळे सुकर होऊ शकेल. एखाद्या विषयासंदर्भात उपलब्ध अद्ययावत ज्ञान आणि वर्तमान अभ्यासक्रम यांच्यामधील तफावत ओळखून सुधारणा सुचवण्यासाठी मोठ्या प्रमाणात डेटाचे विश्लेषण करण्याचे काम जनरेटिव्ह एआयवर सोपवले जाऊ शकते. अर्थात, एआय नवीन विषयांची शिफारसही करू शकते, शिक्षणातील भविष्यकालीन प्रवाहांचा- 'ट्रेण्ड'चा अंदाजदेखील लावू शकते. थोडक्यात, शिक्षणामध्ये जनरेटिव्ह एआयचा वापर केवळ शिकणाऱ्यांनाच फायदेशीर ठरत नाही तर ज्ञान देण्याच्या आणि प्राप्त करण्याच्या पद्धतीलाही आकार देतो. परिणामी एआय हे अधिक समावेशक, प्रभावी आणि आकर्षक शिक्षण अनुभवाच्या निरंतर शोधाचे एक महत्त्वपूर्ण साधन ठरते.

# राज्यपाल आणि विधानमंडळ

"या तरतुदीमध्ये राज्यपालांना विधानमंडळाच्या सत्रांसाठी बैठक बोलावण्याचा अधिकार आहे. सत्रसमाप्ती करण्याचाही अधिकार आहे. मुख्य म्हणजे विधानसभा विसर्जित करण्याचा अधिकार आहे. मला असे वाटते की, विधानसभा विसर्जित करण्याच्या अधिकाराबाबत अधिक नेमकी मांडणी करायला हवी. विधानसभा विसर्जित करण्यासाठी काही आवश्यक अटींची पूर्तता करायला हवी. अन्यथा याचा गैरवापर होऊ शकतो. प्रशासन चालवण्यायोग्य परिस्थिती नसेल किंवा मंत्री परिषद पूर्णतः अस्थिर झालेली असेल, अशा परिस्थितीतच विधानसभा विसर्जित करण्याचा अधिकार राज्यपालांना असावा.'' संविधान सभेमध्ये मोहम्मद ताहिर बोलत होते. बिहारमधील ते प्रतिनिधी होते. २ जून १९४९ रोजीची संविधानसभेतील चर्चा सुरू होती राज्यपालांच्या अधिकाराबाबत. आताच्या संविधानातील १७४ व्या अनुच्छेदाचा संदर्भ होता. स्वविवेकाधीन अधिकार दिला तर राज्यपाल त्याचा गैरवापर करू शकतात, ही भीती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हे अमान्य होते. त्यामुळे ताहिर यांची दुरुस्ती स्वीकारली गेली नाही आणि राज्यपालांना विधानसभा अधिवेशन बोलावणे किंवा विसर्जित करणे असे अधिकार असल्याचा केवळ उल्लेख झाला. हा स्वविवेकाधीन (डिस्क्रेशनरी) अधिकार असल्याचा अन्वयार्थ काढला गेला. या अनुषंगाने नबाम रेबिया खटला (२०१६) महत्त्वाचा आहे. राज्यपालांनी अरुणाचल प्रदेश येथील विधानसभा अधिवेशन सत्र बोलावणे आणि विधानसभेचे अध्यक्ष यांनी आमदारांना अपात्र करणे हे दोन मुख्य मुद्दे या खटल्यामध्ये होते. ''ज्या विधानसभा-अध्यक्षाच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव सुरू आहे तो अध्यक्ष अपात्रतेच्या संदर्भात निर्णय घेऊ शकत नाही. तसेच राज्यपाल मंत्रिमंडळाच्या सल्ल्याशिवाय अधिवेशन बोलावू शकत नाही,'' असे या निकालपत्रात म्हटले होते. याचाच अर्थ अधिवेशन बोलावणे किंवा विधानसभा विसर्जित करणे या अधिकारांचा वापर राज्यपाल हवा तसा करू शकत नाहीत. ऑगस्ट २०२० मध्ये राजस्थानातील विधानसभेचे अधिवेशन बोलावण्यास तेथील राज्यपाल विलंब करत होते. या वेळीही सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद १७४ मधील राज्यपालांचा अधिकार स्वविवेकाधीन स्वरूपाचा नाही, हे अधोरेखित केले. या निकालपत्रातही सर्वोच्च न्यायालयाने नबाम रेबिया खटल्याचा दाखला दिला. राज्यपालांना असलेले स्वविवेकाधीन अधिकार मर्यादित आहेत आणि त्याचा वापर त्यांनी काळजीपूर्वक करावा, असा सल्लाही दिला. यापुढील संविधानाच्या १७५ व्या अनुच्छेदानुसार राज्यपालांना राज्य विधानमंडळाच्या सभागृहाला किंवा दोन्ही सभागृहांना उद्देशून अभिभाषण करण्याचा अधिकार आहे. या अभिभाषणासाठी आमदारांनी उपस्थित राहणे आवश्यक असल्याचे राज्यपाल सांगू शकतात. काही विधेयकांबाबत किंवा इतर बाबींच्या अनुषंगाने एखादा संदेश राज्यपाल देऊ शकतात. त्यानुसार विधानसभेत किंवा विधान परिषदेत त्यावर तातडीने चर्चा होऊ शकते. याशिवाय राज्यपालांना विशेष अभिभाषणाचा हक्कही १७६ व्या अनुच्छेदानुसार आहे. हे विशेष अभिभाषण प्रत्येक विधानसभेच्या निवडणुकीनंतर केले जाते. तसेच प्रत्येक वर्षाच्या पहिल्या सत्राच्या सुरुवातीला राज्यपाल अभिभाषण करतात. राज्यपालांनी विधानमंडळाच्या सदस्यांना या अभिभाषणाचे प्रयोजन स्पष्ट करणे आवश्यक आहे. सभागृहांच्या कामकाजाच्या अनुषंगाने राज्यपाल भाष्य करू शकतात. याशिवाय मंत्र्यांना आणि राज्याच्या महाधिवक्त्यास विधानसभा आणि विधान परिषद या दोन्हींच्या कामकाजांमध्ये सहभाग घेण्याचा अधिकार आहे, असे १७७ व्या अनुच्छेदात म्हटले आहे. भाषण करण्याचा, दुरुस्त्या सुचवण्याचा, वेगवेगळ्या समित्यांमध्ये काम करण्याचा अधिकार असला तरीही या अनुच्छेदानुसार त्यांना मतदानाचा अधिकार नाही.

# तिसरी आघाडी आल्यास फायदा कोणाला?

**महाराष्ट्र राज्यामध्ये अलीकडच्या इतिहासामध्ये दोन प्रादेशिक पक्षांमध्ये विभाजन होऊन त्यांचे चार पक्ष झाले असल्यामुळे आता मोठ्या आणि राजकारणाच्या मैदानात असलेल्या मुख्य पक्षांची संख्या सहा झाली आहे. याव्यतिरिक्त आकाराने लहान असणारे इतर तीन-चार पक्षही राजकारणात सक्रिय आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात आता विधानसभा निवडणुकीत आठ ते नऊ पक्ष एकमेकांशी झुंज देणार, अशी परिस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर जर तिसरी आघाडी स्थापन केली, तर त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर आणि येणाऱ्या विधानसभा निवडणुकांवर काय आणि कसा परिणाम होईल? हा सध्या चचेर्चा विषय बनला आहे.**



भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची महायुती आणि दुसऱ्या बाजूला काँग्रेस, शिवसेना (उबाठा) पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांची महाविकास आघाडी अशा दोन आघाड्यांमध्ये मुख्य लढा असला, तरी आता काही अपक्ष नेते आणि काही छोट्या पक्षांचे नेते यांनी एकत्र येऊन तिस[illegible]या आघाडीसाठी हालचाली सुरू केल्या आहेत. या आठवड्यातच पुणे शहरांमध्ये अशा पक्षांच्या नेत्यांची एक बैठक झाली आणि त्यात सकारात्मक चर्चा झाली, असे नेत्यांनी सांगितले. यामध्ये शेतकरी आंदोलनाचे नेते राजू शेट्टी, माजी राज्यसभा सदस्य संभाजीराजे छत्रपती आणि विदभार्तील राजकारणात अतिशय सक्रिय असलेले बच्चू कडू या नेत्यांचा समावेश आहे. या नेत्यांनी आणि प्रकाश आंबेडकर व अन्य काही नेत्यांनी एकत्र येऊन, जर तिसरी आघाडी स्थापन केली, तर त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर आणि येणाऱ्या विधानसभा निवडणुकांवर काय आणि कसा परिणाम होईल? हा सध्या चचेर्चा विषय बनला आहे.

सामान्यपणे लोकसभा निवडणुकीत जे मुद्दे प्रचारामध्ये चालले, तेच मुद्दे आता पुढील येणाऱ्या निवडणुकीमध्ये चालतील का? हा विषय सध्या चर्चेमध्ये आहे. लोकसभा निवडणुकीत चाललेले तीन मुद्दे म्हणजे, शेतकऱ्यांच्या समस्या, मराठा आरक्षणावरून सुरू असलेले आंदोलन आणि 'संविधान खतरे में है' हा विरोधकांनी केलेला प्रचार. या तीन मुद्द्यांभोवतीच राजकारण तापले आणि त्यातूनच जे निकाल तसे लागले. राजकीय निरीक्षकांच्या मते आताच्या निवडणुकीत शेतकऱ्यांच्या समस्या आणि मराठा आरक्षणाचा मुद्दा हे दोन मुद्दे मात्र सध्या सुद्धा पेटलेले आहेत. अशा परिस्थितीमध्ये सत्ताधारी महायुतीमध्ये थोडीशी हालचाल दिसते आहे. विविध प्रकारच्या आकर्षक योजना आणून आपल्यासमोर असलेले राजकीय आव्हान कसे परतवता येईल किंवा त्याला कसे उत्तर देता येईल, असा प्रयत्न महायुतीचे नेते करताना दिसत आहेत. याव्यतिरिक्त शेतकऱ्यांसाठीच्या योजना आणि अन्य आकर्षक योजना आणण्यात येत आहेत. पण तरीही महायुतीच्या नेत्यांना दोन विषयांची चिंता आहे. एक म्हणजे राज्यात पुन्हा सुरू झालेले मनोज जरांगे-पाटील यांचे आंदोलन आणि दुसरे म्हणजे, सध्या राज्यात अनेक भागात दिसणारी शेतकऱ्यांची हलाखीची परिस्थिती. यावर तोडगे कसे काढायचे याबद्दल सत्ताधारी पक्षांमध्ये खल सुरू आहे. गेल्या काही दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट या पक्षामध्ये येणाऱ्या नेत्यांची संख्या जशी हळूहळू वाढते आहे ते पाहिल्यानंतर तळागाळाच्या पातळीला जनतेमध्ये विरोधी पक्षांच्या बाजूला थोडा कल असल्याचा काहींचा समज आहे.

या पार्श्वभूमीवर राज्यांमध्ये तिसरी आघाडी स्थापन झाली, तर त्याचा फायदा कोणाला आणि कसा मिळेल याबद्दल निरीक्षकांना काय वाटते याचा अंदाज घेतला, तर असे दिसते की, साधारणपणे तिसरी आघाडी येण्याचा फायदा सत्ताधारी महायुतीलाच मिळेल. याचे कारण महाविकास आघाडीची मते ही सर्वसाधारणपणे सरकारच्या विरोधात असलेली मते आहेत आणि तिसऱ्या आघाडीच्या नेत्यांचा सूर हा सुद्धा सरकारच्या विरोधातच आहे. राजू शेट्टी, बच्चू कडू आणि संभाजीराजे छत्रपती या तिन्ही नेत्यांनी तिसरी आघाडी स्थापन करण्यात पुढाकार घेतला आहे.

अशाप्रकारे तिसरी आघाडी स्थापन झाली, तर तिचा काही प्रमाणात फटका महाविकास आघाडीला बसेल हे उघड आहे. पण मुद्दा असा की, त्यांच्याकडे उमेदवार आहेत का? उमेदवार राज्याच्या विविध भागांमध्ये उभे करावे लागतील. तिसरी आघाडी म्हणून जर हे नेते एकत्र लढणार असतील तर त्यांना राज्याच्या वेगवेगळ्या भागात स्वतःचे अस्तित्व दाखवावे लागेल. किमान शंभर मतदारसंघांमध्ये तरी त्यांना उमेदवार उभे करावे लागतील. त्यांना आर्थिक बळ उभे करावे लागेल तसेच प्रचाराची साधनसामग्री जमवावी लागेल आणि जनतेमध्ये चेहरा म्हणून मान्य होतील असे उमेदवार निवडावे लागतील. हे सगळे करण्यासाठी आता केवळ दीड महिन्याचा अवधी आहे इतक्या कमी वेळेत हे सगळे होऊ शकते का, हा प्रश्न आहे. यामुळे सगळीच राजकीय अनिश्चितता वाढली आहे.

संभाजी राजे छत्रपती यांना भारतीय जनता पक्षाने राज्यसभा सदस्यत्व दिले होते. त्यांनाही पुन्हा वेगळ्या पद्धतीचे काही आश्वासन दिले, तर काय होईल हाही प्रश्न आहेच. म्हणजे थोडक्यात असे की, समजा तिसऱ्या आघाडीने आपले उमेदवार उभे केले आणि त्यातील काही निवडून आले तरी निवडणूक झाल्यानंतरच्या काळामध्ये त्या उमेदवारांची भूमिका काय असेल हाही विषय येतोच.

यासंदर्भात राष्ट्रीय पातळीवरील थोडासा परिपेक्ष जर बघितला, तर आपल्याला लक्षात येते की तिसऱ्या पक्षाने उभे राहणे याचा फायदा नेहमीच दोन पक्ष जे मुख्य स्पर्धेत असतात त्यांच्यापैकी एकाला मिळतो तिसऱ्या पक्षाला तो मिळत नाही. म्हणजे दिल्लीमध्ये, किंवा गुजरातमध्ये किंवा गोव्यामध्ये, आम आदमी पक्षाने उमेदवार उभे करणे याचा फायदा कायम भारतीय जनता पक्षाला मिळत राहिला. भारतीय जनता पक्षविरुद्ध काँग्रेस अशी लढत असताना विविध राज्यांमध्ये जर आम आदमी पक्षाने उमेदवार उभे केले, तर त्याचा फायदा ज्या प्रकारे भारतीय जनता पक्षाला मिळत गेला, तसेच महाराष्ट्रात आता तिसरी आघाडी जर आली, तर त्याचा फायदा भारतीय जनता पक्षप्रणित महायुतीला मिळणार आहे. मागच्या लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाने अशाच प्रकारे काही छोट्या पक्षांना उभे केले आणि त्याच्यामुळे विरोधी पक्षांची मते विभाजित व्हावी अशी रचना केली असा आरोप काही निरीक्षक करतात. अर्थात गेल्या निवडणुकीमध्ये सत्ताधारी पक्षाला म्हणजे महायुतीला त्याचा काही फारसा फायदा झाला नाही. पण यावेळी मात्र विधानसभा निवडणुकीमध्ये तिसरी आघाडी म्हणून काही पक्ष एकत्र येऊन उभे राहिले तर त्याचा लाभ हा सत्ताधारी महायुतीलाच मिळणार हे स्पष्ट आहे.

महाराष्ट्राला सुसंस्कृत राजकारण हवे आहे. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांची परंपरा असलेल्या महाराष्ट्राला आम्ही एक वेगळे आणि सुसंस्कृत राजकारण देऊ इच्छितो, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यासाठीची सुरुवात कदाचित त्यांनी आधी करायला हवी होती. असे बरेच निरीक्षक मानतात. कारण तिसऱ्या आघाडीमधील नेत्यांमध्ये जागावाटप करणे उमेदवारांचे चेहरे निश्चित होणे या सगळ्या गोष्टींसाठी आता थोडा अवधी उरला आहे. कदाचित मतदारांना प्रस्थापित चेहऱ्यांचा आणि त्यांनी बदललेल्या भूमिकांचा कंटाळा आलेला असेल, तर तिसऱ्या आघाडीकडे एक नवा पर्याय म्हणून मतदार बघू शकतात. तसे झाले आणि तिसऱ्या आघाडीला येणाऱ्या विधानसभेत ३५-४० जागा जरी मिळू शकल्या तरी तो एक प्रकारचा गेमचेंजर ठरेल.

# ठाणे जिल्हा परिषद ऑनलाईनच्या वाटेवर

## बांधकाम विभागातील कामांचे आता लॉटरी पद्धतीने वाटप



**८६६ ऑनलाईन अर्ज प्राप्त**

ही प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने कामाच्या चिठ्ठया काढून लॉटरी पद्धतीने राबविण्यात येत होती. कामांचे विभाजन योग्य पध्दतीने करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून १ कोटी रकमेची काम ठेकेदाराने पूर्ण केल्यानंतर पुढील काम नवीन ठेकेदारास देण्यात येणार आहे. ekamwatapthanezp.in या संकेतस्थळावर विकासकामे प्राप्त करण्यासाठी ८६६ ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले होते.

**ठाणे :** ठाणे जिल्हा परिषदेमार्फत सुशिक्षित बेरोजगार अभियंता मजूर कामगार सहकारी संस्था यांना बांधकाम विभागातील १० लाखांच्या आतील विकासकामे आता ऑनलाईन लॉटरी पद्धतीने मिळणार आहेत. विकासकामांना गती देण्याच्या तसेच आर्थिक व्यवहार पारदर्शकपणे करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषदेने ऑनलाईनचा मार्ग निवडला असून त्याचे सर्वस्तरावर कौतुत होत आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रात पहिल्यांदाच जिल्हा परिषद ठाणे मार्फत पेमेंट गेटवेचा वापर केला जाणार आहे. लॉटरी पद्धतीने मिळणाऱ्या विकासकामांचे वाटप शुक्रवारी बी. जे. हायस्कूल येथे करण्यात आले. सन २०२४-२५ या वषार्तील १६६ विकासकामांचे वाटप ऑनलाईन लॉटरी पद्धतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी तंत्रज्ञानाची जोड घेऊन विकासकामांचे लॉटरी पद्धतीने वाटप करण्यात आले. यामार्फत काम वाटप आणि आर्थिक व्यवहार पारदर्शकपणे करण्याच्या उद्देशाने कामकाज करण्यात आले आहे. पुढील कामवाटप नियोजन ऑनलाईन लॉटरी पद्धतीने फेसबुक, युट्यूब दूरदृश्यप्रणाली द्वारे देखील (लाईव्ह) करण्यात येणार आहेत. विकासकामांना गती मिळण्यासाठी ही उत्तम सुरुवात असल्याचे म्हटले जात आहे. त्याचबरोबर कामे देखील उत्तम पद्धतीने व्हावी, अशी अपेक्षा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी व्यक्त केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील विकास कामाचे वाटप ऑनलाईन लॉटरी पद्धतीने करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले असून कामवाटप, वेळेची बचत, पारदर्शकता आणण्यासाठी ऑनलाईनचा वापर हा मोलाचा ठरत आहे. कामवाटप ऑनलाईन पद्धतीने राबवणारी महाराष्ट्रातील ठाणे ही ७ वी जिल्हा परिषद असून पेमेंट गेटवे वापर करणारी महाराष्ट्रातील ठाणे जिल्हा परिषद ही पहिली ठरली आहे. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कामांना गती मिळणार असून लॉटरी पद्धतीने काम मिळालेल्या सर्वांचे अभिनंदन, असे प्रास्ताविक करताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कार्यकारी अभियंता (बांधकाम) संदिप चव्हाण, उप कार्यकारी अधिकारी सुनिल बच्छाव, आरेखक संजीव यशवंत, बांधकाम विभागातील अधिकारी व कर्मचारी, ठेकेदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"ही कामवाटप प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबवली जात असल्याने जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजूर कामगार सहकारी संस्थेचे पदाधिकारी यांनी समाधान व्यक्त केले आहे. ऑनलाईन लॉटरी पद्धतीने काम मिळाल्यामुळे जिल्हा परिषदेचे आभार व्यक्त करतो. ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे, सद्यस्थिती, पुढील कामाचे नियोजन करण्यासाठी सुलभता निर्माण झाली आहे."

**– सिताराम भावार्थे, पदाधिकारी मजूर संस्था**

"पूवीर्ची ऑफलाईन प्रक्रिया राबविताना कागदपत्रांचा वापर जास्त प्रमाणत होत होता, तसेच जमा झालेली रक्कम चलनाद्वारे बँकेत भरावी लागत होती. आता ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणारी कामवाटप प्रक्रियेत स्टेशनरीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाचणार असून निविदा रकमेचा भरणा हा संबधित सुशिक्षित बेरोजगार अभियंता मजूर कामगार सहकारी संस्था यांच्या बँक खात्यातून ऑनलाईन पद्धतीने जिल्हा परिषदेच्या बँक खात्यात जमा होणार आहे. तसेच ऑनलाईन सॉफ्टवेअरद्वारे विकासकामांचे वाटप झाले असून कामकाज वेगवान तंत्रज्ञान युक्त व पारदर्शक होणार आहे. यामुळे खऱ्या अर्थाने ठाणे जिल्हा परिषद हायटेक झालेली आहे."

**– संदीप चव्हाण, माहिती कार्यकारी अभियंता (बांधकाम)**

# ठाणे स्थानकात रात्री ६ तासांचा पॉवर ब्लॉक

**ठाणे :** मध्य रेल्वेच्या ठाणे रेल्वे स्थानकात शनिवार २१ सप्टेंबर रोजी रात्री साडेदहापासून रविवार २२ सप्टेंबरच्या पहाटे साडेचारपर्यंत पादचारी पूल गर्डर बसवण्यात येणार आहे. या महत्त्वाच्या कामासाठी विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेण्याचा निर्णय रेल्वेने घेतला आहे.

या ब्लॉकदरम्यान सहाव्या मार्गावर चालणाऱ्या मेल व एक्स्प्रेस गाड्या कल्याण-दिवा ते मुलुंड-विद्याविहार स्थानकांदरम्यान अप-जलद मार्गावर वळवण्यात येणार आहेत. या पॉवर ब्लॉकमुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी रेल्वेने प्रवास करणे टाळावे व सहकार्य करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे. ठाणे रेल्वे स्थानकात ठाणे पूर्व येथील चेंदणी बंदर ते ठाणे पश्चिम यांना जोडणाऱ्या पुलाचे गर्डर बसविण्याचे काम मध्ये रेल्वे प्रशासनाकडून हाती घेण्यात येणार आहे. ब्लॉकदरम्यान सुटणाऱ्या उपनगरीय सेवा आणि ठाणेकरिता वाशी येथून २१.३७ ते पनवेल येथून २३.१८ वाजेपर्यंत जाणाऱ्या उपनगरीय सेवा रद्द करण्यात आली आहे. तर डाऊन ट्रान्सहार्बर लाइनवरील ब्लॉकपूर्वीची शेवटची लोकल ठाणे येथून २१.४१ वाजता सुटेल आणि वाशी येथे २२.१० वाजता पोहोचेल. अप ट्रान्सहार्बर लाइनवरील ब्लॉकपूर्वीची शेवटची लोकल वाशी येथून २१.२४ वाजता सुटेल आणि ठाणे येथे २१.५३ वाजता पोहोचेल. डाऊन ट्रान्सहार्बर मार्गावरील ब्लॉकनंतर पहिली लोकल ठाणे येथून ०५.१२ वाजता सुटेल आणि पनवेल येथे ०६.०४ वाजता पोहोचेल. अप ट्रान्सहार्बर मार्गावरील ब्लॉकनंतर पहिली लोकल वाशी येथून ०६.३० वाजता सुटेल आणि ठाणे येथे ०६.५९ वाजता पोहोचेल.

# मोबाईल वापरण्यास दिला नाही म्हणून तरुणीची आत्महत्या

**डोंबिवली :** आईने मोबाईल हाताळण्यास दिला नाही म्हणून राग अनावर झालेल्या डोंबिवलीतील देसलेपाडा भागातील लोढा हेरिटेज भागातील एका १९ वर्षाच्या तरूणीने गुरुवारी रात्री राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेने लोढा हेरिटज परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. संजना हेमांगी झोरे असे मयत तरुणीचे नाव आहे. आई हेमांगी झोरे यांनी यासंदर्भात मानपाडा पोलीस ठाण्यात माहिती दिल्यानंतर पोलिसांनी अकस्मित मृत्युची नोंद केली आहे.

आई हेमांगी आणि मयत मुलगी हे कुटुंब देसलेपाडा येथील लोढा हेरिटेजमधील एका गृहसंकुलात राहते. मयत मुलीची आई हेमांगी या नोकरी करतात. मयत मुलगी शिक्षण घेत होती. तिने मोबाईलवर वेळ घालविण्यापेक्षा अभ्यास करावा, असे आईचे मत होते. त्यामुळे



आई तिला मोबाईल वापरापासून प्रतिबंध करत होती. गुरुवारी रात्री आई, मुलगी दोघी घरात होत्या. रात्री साडे नऊ वाजण्याच्या दरम्यान मयत मुलीने आईकडे मोबाईल हाताळण्यास मागितला.

त्यावेळी आईने मोबाईलपेक्षा अभ्यास कर असा सल्ला दिला. तिला मोबाईल देण्यास नकार दिला. याविषयी मयत मुलगी संजना झोरे हिला राग आला. तिने रागाच्या भरात घरातील एका खोलीत पंख्याच्या छताला गळफास घेऊन आत्महत्या केली. आईने दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. मुलगी आतून दरवाजा उघडत नव्हती. सोसायटीतील सदस्यांनी धावपळ करून खोलीत पाहिले तर संजनाने गळफास घेतला होता. मानपाडा पोलिसांना ही माहिती देण्यात आली. मुलीला तातडीने पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या मृत्युविषयी कोणावरही संशय नसल्याचे मुलीच्या आईने मानपाडा पोलीस ठाण्यातील दाखल नोंदीत म्हटले आहे. साहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव पालवे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

**पती–पत्नीची गळफास घेऊन आत्महत्या**

शहापूर : येथील नडगाव भागात पती-पत्नीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी उघडकीस आली. याप्रकरणाची नोंद शहापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मुल होत नसल्याने त्यांनी नैराश्यातून आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. हरेश उघडे (२८) आणि निलम उघडे (२५) अशी आत्महत्या केलेल्या दोघांची नावे आहेत. नडगाव येथील बेलपाडा परिसरात ते वास्तव्यास होते. आठ वर्षांपूर्वी त्यांचा विवाह झाला होता. गुरुवारी त्यांचा मृतदेह घरामध्ये गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.

घटनेची माहिती शहापूर पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखळ झाले. मुल होत नसल्याने त्यांना नैराश्य आले होते. त्यामुळे त्यांनी आत्महत्या केली असावी असा अंदाज पोलीस व्यक्त करत आहेत.

# जेईईत अव्वल गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची आयआयटी मुंबईला पसंती

**आयआयटी मुंबईला १३० कोटींचे सहकार्य**

जागतिक दर्जाच्या शैक्षणिक पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी मोतीलाल ओसवाल फाऊंडेशनकडून आयआयटी मुंबईला १३० कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य करण्यासंदभार्तील भागीदारी करार नुकताच झाला. या करारांतर्गत आयआयटी मुंबईच्या परिसरात १ लाख ते १.२ लाख चौरस फूट क्षेत्रफळाच्या जागेवर मोतीलाल ओसवाल ज्ञान केंद्र बांधण्यात येणार आहे. नावीन्य, संशोधन आणि संशोधनासाठी अत्याधुनिक शैक्षणिक केंद्र म्हणून ते काम करेल. शैक्षणिक उत्कृष्टता, प्रगत प्रयोगशाळा, संशोधन केंद्रे यामुळे मोतीलाल ओसवाल ज्ञान केंद्र हे विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये आयआयटी मुंबईतून जागतिक नेतृत्व घडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. राष्ट्रनिर्मिती आणि आर्थिक क्षेत्रातील शैक्षणिक उत्कृष्टतेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण वाटचाल आहे.




**मुंबई :** भारतीय तंत्रज्ञान संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या जेईई परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबईला (आयआयटी मुंबई) पसंती दिली आहे. अव्वल दहा विद्यार्थी आयआयटी मुंबईत दाखल होणार आहेत. या शैक्षणिक वषार्साठी आयआयटीतील प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांची अर्ज नोंदणी करण्यात आली आहे. त्यानंतर पहिल्या फेरीसाठी १७ जुलै रोजी जागा वाटप करण्यात आले. यात जेईई परीक्षेत अव्वल गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी आयआयटी मुंबईला पसंती दिल्याची निदर्शनास आले आहे. पहिल्या १० क्रमांकात असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी आयआयटी मुंबईची निवड केली आहे. पहिल्या २५ मधील २३ विद्यार्थ्यांनी तर पहिल्या ५० मधील ४७ विद्यार्थ्यांनी आयआयटी मुंबईची निवड केली आहे. त्यात एका विद्यार्थिनीचा तर ४६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. पहिल्या ७५ पैकी ६६ विद्यार्थ्यांनी तर १०० पैकी ७२ विद्यार्थ्यांनी आयआयटी मुंबईला पसंती दिली आहे. जेईई (अॅडव्हान्स) परीक्षेत अव्वल गुण मिळवणाऱ्या बहुतांश विद्यार्थ्यांनी आयआयटी मुंबईला पसंती दिली आहे. त्याचा अभिमान आहे. या विद्यार्थ्यांचे आयआयटी मुंबईत स्वागत करतो, अशा शब्दात आयआयटी मुंबईचे संचालक प्रा. शिरीष केदारे यांनी सांगितले. मोतीलाल ओसवाल फाऊंडेशनद्वारे देण्यात आलेले हे योगदान भारतीय शैक्षणिक संस्थांना आतापर्यंतचे विविध संस्थांनी दिलेले सर्वात मोठे सामाजिक दायित्व योगदान आहे. मोतीलाल ओसवाल आणि रामदेव अग्रवाल, एमओएफएसएलचे सह-संस्थापक यांनी स्थापन केलेल्या फाउंडेशनच्या माध्यमातून चार हजार कोटी सामाजिक उपक्रमांसाठी देण्यात येणार आहे.

# कल्याण पूर्वेतील चिंचपाडा येथील ६० फुटी रस्त्याची दुर्दशा; शाळकरी विद्यार्थ्यांचे सर्वाधिक हाल



सर्वाधिक वर्दळीचा हा रस्ता आहे. हे माहिती असुनही पालिकेचे बांधकाम विभागाचे अधिकारी, या रस्त्याचा ठेकेदार खड्डे भरण्यासाठी किंवा रस्ता सुस्थितीत करण्यासाठी पुढाकार घेत नसल्याने परिसरातील नागरिकांसह शिक्षक, पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. चिंचपाडा परिसरात नवीन गृहसंकुले झाली आहेत. या भागातील वस्ती वाढली आहे. कल्याण पूर्व रेल्वे स्थानकाकडून प्रवासी याच रस्त्याने रिक्षा, खासगी वाहनाने प्रवास करतात. गणपती सणापूर्वी या रस्त्यावरील खड्डे खडी टाकून भरण्यात आले होते. ही वरवरची मलमपट्टी असल्याने सततच्या वाहनांच्या वर्दळीमुळे या खड्ड्यांमधील खडी निघून तेथे मोठाले खड्डे पडले आहेत.

**कल्याण :** कल्याण पूर्व भागातील चिंचपाडा भागातील ६० फुटी रस्त्यावर मोठ्या आकाराचे खड्डे पडले आहेत. या रस्त्यावरून प्रवास करताना प्रवाशांचे हाल होत आहेत. या रस्त्यावर दोन शाळा आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांसह, पालक, शिक्षकांना दररोज या खड्ड्यांना सामोरे जात शाळेची वाट धरावी लागते. चिंचपाडा परिसरातील पालक सकाळ, संध्याकाळ या खड्डे पडलेल्या रस्त्यांवरून आपल्या मुलांना शाळेत घेऊन येतात. शाळेत जाताना खड्यांच्या भागातून जाताना अनेक वेळा वाहन खड्ड्यात आपटले की ते माती मिश्रित पाणी विद्यार्थी, पालकांच्या अंगावर उडते.

बाजारात खरेदीसाठी आलेल्या पादचाऱ्यांना हाच अनुभव येतो. ज्येष्ठ नागरिक, वृध्दांना या रस्त्यावरून जाताना कसरत करावी लागते. अनेक रिक्षा चालक ६० फुटी रस्त्यावरील खड्ड्यांमुळे या भागातील प्रवासी भाडे घेण्यास नकार देतात. त्यामुळे कल्याण पूर्व रेल्वे स्थानकाकडून चिंचपाडाकडे येणाऱ्या प्रवाशांची दररोज कुचंबणा होत आहे.

येत्या दोन दिवसात ६० फुटी रस्त्यावरील खड्डे पालिकेने बुजविले नाहीतर या भागातील रहिवासी पालिकेच्या विरोधात आंदोलन करण्याच्या पवित्र्यात आहेत.

# बनावट पावत्यांद्वारे कंपनीची पावणेदोन कोटींची फसवणूक




**मुंबई :** बनावट पावत्यांद्वारे कंपनीची पावणेदोन कोटी रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली अंधेरी पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला. आरोपींना भारतीय न्याय संहिता कलम ३५ (३) अंतर्गत नोटीस देण्यात आली आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

अंधेरी पूर्व येथील एका कंपनीत मुख्य वित्तीय अधिकारी पदावर कार्यरत असलेल्या श्याम महेश्वरी यांच्या तक्रारीवरून अंधेरी पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधान कलम ४२०, ४०६ व ३४ अंतर्गत दीपक शर्मा आणि फ्रॅंकलीन जॉर्ज यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार कंपनीत कार्यरत असताना शर्मा याने माल नेण्यासाठी ७५ गाड्यांची आवश्यकता भासल्याच्या बनावट पावत्या तयार केल्या. त्याद्वारे आगाऊ रक्कम घेतली. तसेच कंपनीला येणाऱ्या सुमारे १ कोटी ७९ लाख रुपयांच्या रकमेचा अपहार केल्याचा, तसेच याप्रकरणात फ्रॅंकलीन याने आरोपीला मदत केल्याचा आरोप आहे.

# मीरा-भाईंदर शहराला पाणी कपातीचे ग्रहण

**पाणीपुरवठ्याचा शुभमुहूर्त पुन्हा एकदा पुढे ढकलला**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मे २०२४ पर्यंत पाणीपुरवठा सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानतंर गणेशोत्सवापर्यंत पाणीपुरवठा सुरू करण्याचे आश्वासन दिले. परंतु पाणीपुरवठ्याचा शुभमुहूर्त पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आला आहे. शहरवासीयांना २०२५ ची वाट पहावी लागणार आहे. एकीकडे मीरा- भाईंदर शहरातील पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. तर दुसरीकडे बहुप्रतीक्षित सूर्या प्रकल्पातून पाणीपुरवठा होण्यास विलंब होत असल्याने शहरवासीयांचे हाल होत आहेत. ऐन गणपती उत्सवामध्ये महापालिकेने शुक्रवारी पाणीपुरवठा बंद ठेवला आहे.

**मुंबई :** भाईंदर मीरा-भाईंदर शहरात विविध कामांसाठी वारंवार पाणीपुरवठा काही तासासाठी बंद करण्यात येतो. यावर्षी जिल्ह्यात पुरेसा पाऊस पडूनही वारंवार विविध कामांसाठी पाणी कपात करण्यात येते. मीरा-भाईंदर शहराला पाणी कपातीचे ग्रहण लागलेले आहे. हे पाणी कपातीचे ग्रहण कधी संपणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मीरा- भाईंदर शहराला करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यात कपात करण्यात येत असल्यामुळे शहरातील रहिवाशांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. ऐन सणासुदीमध्ये पाणीटंचाई होत असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

मीरा-भाईंदर शहराला स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) प्राधिकरणाकडून पाणीपुरवठा करण्यात येतो. या दोन्ही प्राधिकरणाकडून जवळपास २१० एमएलडी पाणी मंजूर करण्यात आले आहे. परंतु दररोज जवळपास १९० एमएलडी पाणीपुरवठा शहरास करण्यात येत आहे. शहराची लोकसंख्या वाढत असताना हा पाणीपुरवठा कमी आहे. त्यात दर आठवड्याला काहीना काही कामांसाठी पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येतो. यामुळे शहरातील नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. या पाणीटंचाईतून नागरिकांची सुटका करण्यासाठी सूर्या प्रकल्पातून मीरा-भाईंदर शहराला पाणीपुरवठा करण्यात येणार आहे.



**पाणीपुरवठा विभागाचे आवाहन**

बारावी व उल्हास नदीपात्राच्या परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे नदीपात्रात मोठ्या प्रमाणात डेब्रिज व कचरा जमा होत आहे. त्यामुळे बारावी पंप हाऊस येथील पंपाचे स्ट्रेनर्स वारंवार चोकअप होत आहेत. त्यामुळे पंप पूर्ण क्षमतेने पाणी खेचत नसल्याने कमी प्रमाणात पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे बारवी वॉटर वर्क्स येथे पंप स्ट्रेनर्स आणि ग्रिल साफ करण्यासाठी शुक्रवारी दुपारी १२ ते संध्याकाळी ५ पर्यंत असे ५ तासांसाठी एमआयडीसी प्राधिकरणाकडून होणारा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. एमआयडीसी प्राधिकरणाकडून होणारा पाणीपुरवठा पूर्ववत होईपर्यंत शहरास पाणीपुरवठा कमी दाबाने व उशिराने होईल. नागरिकांनी पाण्याचा वापर जपून व काटकसरीने करून महापालिकेस सहकार्य करावे, असे पाणीपुरवठा विभागाकडून आवाहन करण्यात आले आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून अॅसिड फेकण्याची धमकी, ६० वर्षीय व्यक्तीला अटक

**मुंबई:** धारावी येथे १५ वर्षीय मुलीवर अत्याचार करून चाकूचा धाक दाखवणाऱ्या ६० वर्षीय व्यक्तीला धारावी पोलिसांनी अटक केली. आरोपीने पीडित मुलीला अॅसिड फेकण्याचीही धमकी दिली.

याप्रकरणी आरोपीविरोधात बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण(पोक्सो) कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलगी घरात एकटी असताना आरोपी घरात शिरला. आरोपीने तिला चाकुचा धाक दाखवला. त्यात ती जखमी झाली. आरडाओरडा केल्यास ठार मारण्याची धमकीही त्याने दिली. आरोपीने पीडित मुलीवर लैंगिक अत्याचार केल्यानंतर कोणालाही काही सांगितल्यास अॅसिड फेकण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे पीडित मुलगी घाबरली होती. तिने घडलेला प्रकार आईला सांगितला. त्यानंतर पीडित मुलीच्या आईने याप्रकरणी धारावी पोलिसांकडे तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

त्यानंतर पोलीस पथकाने आरोपीला राहत्या परिसरातून ताब्यात घेतले. त्याला पोलीस ठाण्यात आणून याप्रकरणी अटक करण्यात आली. आरोपी पीडित मुलीच्या कुटुंबियांचा परिचित आहे. याप्रकरणी धारावी पोलीस अधिक तपास करीत आहेत.



हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक डॉ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटिंग प्रेस, कार्यालय ड्ब्ल गाळा नं. ४, एन.के.इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र). येथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक ड्ब्ल श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधीन राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणा-या बातम्या/लेख/जाहिरातीं यांची जबाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४३४९८९८९८ . Email ID : policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr. Dr. Deepak Moreshwar Naik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published A – 2, Rajaram Chs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8434989898, Email ID: policebatmipatra@gmail.com